दिनांक ११/०९/२०२६

प्रेस नोट

"SAY NO TO DRUGS – SAY YES TO LIFE"

परिमंडळ -१ ,ठाणे शहर पोलीसांच्या अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद १७१ शाळांमधील २८ हजारांहून अधिक विद्यार्थी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी

११ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर २०२६ दरम्यान भव्य जनजागृती स्पर्धा —— विजेत्यांना रोख पारितोषीके व ट्रॉफी.

दि.११ सप्टेंबर २०२६ रोजी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ च्या वतीने विद्यार्थी व युवकांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने **Say No to Drugs – Say Yes to Life** या संकल्पनेअंतर्गत अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले.या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, ठाणे शहरातील परिमंडळ-१ मधील नौपाडा, ठाणेनगर , राबोडी, कळवा, मुंब्रा व शिळडायर पोलीस स्टेशन हद्दीतील १७१ शाळांमधील २८ हजारांहून अधिक विद्यार्थी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून एकाच वेळी या जनजागृती कार्यक्रमात सहभागी झाले.अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक दुष्परिणाम विद्याथ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, युवकांना व्यसनापासून दूर ठेवणे, त्यांना सकारात्मक व आरोग्यदायी जीवनशैलीकडे प्रोत्साहित करणे तसेच नशामुक्त भारत – नशामुक्त ठाणे या संकल्पनेला व्यापक लोकसहभागातून पुढे नेणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.वरिष्ठ अधिकारी व मान्यवरांची उपस्थिती सदर कार्यक्रमास मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा.पोलीस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. अशोक दुधे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १,ठाणे श्री. बाळासाहेब पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग श्री. संकेत देवळेकर,सहाय्यक पोलीस आयुक्त, नौपाडा विभाग श्री. संभाजी जाधव, तसेच पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कलाकार मकरंद अनासपुरे, विजू माने, संतोष जुवेकर आणि कुशल बद्रिके यांनी कार्यक्रमास विशेष उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी अमली पदार्थांचे दुष्परिणाम, युवकांच्या जीवनातील योग्य निर्णयांचे महत्त्व तसेच सकारात्मक व आरोग्यदायी जीवनशैली याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.युवकांनी शिक्षण, खेळ, कला, कौशल्यविकास व ध्येयपूर्तीकडे आपली ऊर्जा वळवावी, अंमली पदार्थांपासून स्वत: दूर राहावे आणि आपल्या मित्रांनाही व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

११ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर —— महिनाभर जनजागृती स्पर्धा

जनजागृतीचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी दि. ११ सप्टेंबर २०२६ ते ११ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत **Say No to Drugs – Say Yes to Life** या मुख्य संकल्पनेवर आधारित विविध सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धांमध्ये—

* **Reels / Shorts**
* **Poster / Digital Poster**
* **Open Mic / Poetry / Spoken Word**
* **Street Play / Short Act**

या प्रकारांचा समावेश असुन ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.स्पर्धेमध्ये शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिक सहभागी होऊ शकतात.स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करणा-या विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषीके, ट्रॉफी व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेतील निवडक व उत्कृष्ट **Reels Shorts**,**Posters,Video,Open Mic** सादरीकरणे व इतर कलाकृतींचा अंमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी उपयोग करण्यात येणार असून सोशल मीडिया व इतर माध्यमांद्वारे हा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.या उपक्रमातून युवकांकडून युवकांसाठी आणि समाजासाठी अंमली पदार्थविरोधी संदेश निर्माण करून विद्यार्थी व नागरिकांनाचा या अभियानात सक्रिय सहभागावर भर देण्यात येणार आहे.

१७१ शाळा — २८ हजारांहून अधिक विद्यार्थी : अभियानाची व्यापक सुरुवात

एकाच वेळी १७१ शाळांमधील २८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग मिळाल्याने या अभियानाची व्यापक सुरुवात झाली आहे.आगामी महिनाभर शाळा, महाविद्यालये, युवक, पालक, नागरिक, सामाजिक संस्था व समाजातील विविध घटकांना या अभियानाशी जोडून नशामुक्त भारत — नशामुक्त ठाणे या उद्दिष्टासाठी व्यापक लोकसहभाग निर्माण करण्याचा ठाणे शहर पोलिसांचा प्रयत्न राहणार आहे.

ठाणे शहर पोलिसांनी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना दि. ११ ऑक्टोबर २०२६ पर्यंत या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन अंमली पदार्थविरोधी संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले आहे.

स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी संपर्क:

श्री. विश्वनाथ बिवळकर

मो. ९८१९४८७०६७

श्री. हेमेंद्र भोसले

मो. ९३७२६८६४३५

अंमली पदार्थांना नकार — जीवनाला स्वीकार

SAY NO TO DRUGS – SAY YES TO LIFE

नशामुक्त भारत — नशामुक्त ठाणे

(बाळासाहेब पाटील)

पोलीस उप आयुक्त- परिमंडळ-१,ठाणे